नि.दि.दा.क्रं.५३/२०१६
भागीरथीबाई वि. संजय

## नि.क्र. ३९ खाली आदेश

सदरचा अर्ज वादीने देऊन कथन केले की, हक्कज्ञापन आणि निरंतर ताकीदीसाठी तसेच दि.२५/०६/२०१५ रोजीचे खरेदीपत्र रद्द होण्यासाठी सदर दावा असून दावामिळकतीत वादीचा कब्जा आहे. वादीने न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक होण्यासाठी अर्ज दिला आहे. तो मंजूर झाल्याने प्रतिवादीने त्याविरुध्द ना.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. ती प्रलंबीत आहे. त्याकामातील तुर्तातुर्त अर्जही प्रलंबीत आहे. प्रतिवादीने दावामिळकत  जयवंत नागरगोजे याला दावा सुरु असताना तबदील केली आहे. त्यास सामील पक्षकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे. सोबत शपथपत्र नि.क्रं.४० दिलेला आहे.

२. जयवंत यांच्यावतीने दिलेल्या म्हणण्यात तो  प्रामाणिक खरेदीदार असून त्यास दाव्याची माहिती नाही. मात्र सामील केल्यास तो दावा लढवू शकेल असे कथन केले.

३. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. दावा वर नमूद तीन कारणांसाठी म्हणजे हक्कज्ञापन, निरंतर ताकीद आणि खरेदीपत्र रद्द करुन मागण्याचा आहे.  खरेदीपत्र झाल्यामुळे दावामिळकत त्रयस्थ इसमाच्या नावे तबदील झाली आहे. दावा दाखल असताना आणि प्रतिवादी यांना दावा समन्साची बजावणी झाल्यानंतर आणि त्यांनी आपली कैफीयत दि.२०/०२/२०१६ रोजी दिल्यानंतर, दि. २५/०५/२०२२ रोजी  खरेदीपत्र जयवंत यांच्या लाभात झालेले आहे. त्यामुळे जयवंत यांच्या लाभात करुन दिलेले खरेदीपत्र  हे दाव्यादरम्यानचे असल्याने आणि प्रतिवादी संजय यांच्या लाभात दि.२५/०२/२०१५ रोजी झालेले खरेदीपत्र आक्षेपीत केले गेले असल्याने सदर संजय यांनी करुन दिलेले जयवंत यांचे खरेदीपत्र वादींना पुन्हा आक्षेपीत करावे लागेल. दावामिळकतींमध्ये वादींची वहीवाट सुरवातीपासून आहे असे त्यांचे दाव्यात कथन आहे आणि तशाच अनुषंगाने नि.५ हा तुर्तातुर्त अर्ज हा वादीनी

दाखल केलेला आहे. या तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर माझ्या पूर्व पिठासीन अधिका-यांनी दि.०१/०१/२०१६ रोजी केलेला जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश हा प्रतिवादी याने तुर्तातुर्त अर्जावर म्हणणे देईपर्यंत लागू होता. सदर ताकीद अर्ज वादीनी प्रतिवादीचे म्हणणे दि.२०/०२/२०१६ रोजी आल्यानंतर पुढे चालवला नाही. त्यानंतरच सदर कामी कोणताही आदेश लागू नसल्याने खरेदीपत्र झाल्याचे दिसते. याकामी वादीने मागितलेली दाद ही दि.२५/०६/२०१५ रोजी खरेदीपत्राबद्दल असल्याने आणि त्या खरेदीपत्रांन्वये प्रतिवादीला मिळालेला अधिकार त्याने हस्तांतरीत केल्याने त्रयस्थ पक्षकारास सामील करणे आवश्यक आहे.

**५.** सदर दावा जवळपास १० वर्षे जूना आहे. त्यामुळे याकामी वादीचा अर्ज मंजूर करताना काही अटी वादी व प्रतिवादी यांना घालून देणे गरजेचे आहे. **सबब आदेश खालीलप्रमाणे**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. त्रयस्थ पक्षकारास प्रतिवादी सदरात सामील करावे.

३. वादीने आजच दाव्याची दुरुस्तप्रत सादर करावी.

४. त्रयस्थ पक्षकार जयंवत यांच्यावतीने हजर झालेल्या वकीलांनी सदर दुरुस्तप्रतीची नक्कल आणि दाव्यासोबतची कागदपत्रे वादीकडून स्वीकारावीत.

५. सदरचा दावा आठवडयातून दोन दिवस बोर्डावर ठेऊन चालविण्यात येईल.

६. दाव्यातील वादी, प्रातिवादी यांनी कोणतीही सबब न सांगता प्रत्येक तारखेस दाव्यात हजर राहायचे आहे. हजर न राहिल्यास त्या दिवशी तात्काळ त्यांच्याविरुध्द कायदयानुसार आदेश करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-

**[ एस.एन.सरडे ]**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.

**दिनांक:१८/०७/२०२५.**